Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VII ISSUE- IV APRIL 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# मराठीतील अनुवादीत नाटकाचे स्वरूप

प्रा.डॉ.पद्माकर पिटले
मराठी विभाग प्रमुख
श्री.छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा

**प्रस्तावना :-**

आठराव्या शतकामध्ये पाशिमात्य देशातून ज्ञान आणि विज्ञान आपल्या देशात आयात करण्यात आले. इंग्रजी साहित्याचा परिणाम नव्हे तर तो भारतीय साहित्याचा पाया म्हटले तर ते फारशे वेगळे ठरणार नाही. कालांतराने भारतीय भाषेतील साहित्याचा आणि हिंदी साहित्याचा अनुवाद इंग्रजी आणि अन्य युरोपीयन भाषामध्ये होवू लागला. ही प्रक्रिया भारतीय भाषामध्येही परस्पर पूरक अशीच आणि गतीमान स्वरूपाची होत गेल्याचे दिसून येते. एका भाषेतील अनुभव दुसऱ्या भाषेतील वाचकांपर्यत पोहचविणे किंवा भाषेचे अंतर राखून दोन भाषांमध्ये आदान-प्रदान करणे, किंवा मूळ आशय, शैली, वातावरण, पार्श्वभूमीसह लक्ष भाषेत प्रकट करणे याला भाषांतर असे म्हणतात. हिंदी शब्दकोशात भाषांतर म्हणजे अनुवाद. अनुवाद ही व्यापक अशी संकल्पना असून स्वैर भाषांतर म्हणजे अनुवाद होय. अनुवादाच्या संदर्भात श्री.म.माटे म्हणतात, "अनुवाद आणि भाषांतर हे दोन शब्द अलीकडे समानार्थक म्हणून वापरण्यात येवू लागले आहेत. सध्या भाषांतरालाच अनुवाद म्हणतात आणि अनुवादाला भाषांतर म्हणतात. सुप्रसिध्द कवी गुलजार यांनी, "चांगला अनुवाद म्हणजे फुलाबरोबर चांगल्या सुगंधाचाही भावानुवाद करणं" असे अनुवादाविषयी आपले मत प्रकट केले आहे. भारतीय लेखक के. सतचित्तानंद यांनी इंडिया आणि भारतीय या दोन शब्दांना जोडणारा पुल म्हणजे अनुवाद अशी अनुवादाची व्याख्या केली आहे. अनुवादीत पुस्तके ही दुस-याची अपत्ये वाढविण्यासारखे नाजूक आणि कठिण काम आहे- असे राजहंस प्रकाशनाच्या ग्रंथ संपादक सुजाता देशमुख म्हणतात. मराठी भाषेत पहिला अनुवाद करणा-या विल्यम कॅरी यांनी मॅथ्यूचे शुभवर्तमान हे बायबलचे भाषांतर प्रथम मराठीत आणले.त्यानंतर संस्कतमधील जगन्नाथ पंडीत यांचे गंगालहरी हे पुस्तक आनंदीबाई लेले यांनी मराठीत आणले. कथा, कविता, कादंबऱ्या, नाटक या सगळया वाड़्मय प्रकारात अनुवाद मोठया प्रमाणात परकीय भाषेतून मराठी भाषेत झालेले आहेत. भाषांतर ही जगाला जोडणारी संवेदनशील अशी व्यवस्था आहे. प्रस्तुत शोधनिबंधातून परकीय भाषेतून अनुवादीत झालेल्या नाटकाचे स्वरूप विशेषत: स्त्री नाटककारांनी केलेले भाषांतराचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**भाषांतराचे स्वरूप :-**

मराठी साहित्याचा विचार केला गेला तर सुरूवातीचे सगळे मराठी साहित्य हे अनुवादीत स्वरूपाचे असे होते. त्याला अपवाद कविता हा साहित्यप्रकार म्हणता येईल. या भाषांतराच्या तार्कीक बार्बीचा विचार बाजूला सोडून आपण भाषांतराचे स्वरूप पाहतो तेव्हा ही एक सहज अशी प्रक्रिया आहे असे म्हणता येईल. एका भाषेतील अनुभव दुसऱ्या भाषेतील वाचकांपर्यत पोहचविणे किंवा भाषेचे अंतर राखून दोन भाषांमध्ये आदान-प्रदान करणे, किंवा मूळ आशय, शैली, वातावरण, पार्श्वभूमीसह लक्ष भाषेत प्रकट करणे याला भाषांतर असे म्हणतात. हिंदी शब्दकोशात भाषांतर म्हणजे अनुवाद. अनुवाद ही व्यापक अशी संकल्पना असून स्वैर भाषांतर म्हणजे अनुवाद होय. अनुवादाच्या संदर्भात श्री.म.माटे म्हणतात, "अनुवाद आणि भाषांतर हे दोन शब्द अलीकडे समानार्थक म्हणून वापरण्यात येवू लागले आहेत. सध्या भाषांतरालाच अनुवाद म्हणतात आणि अनुवादाला भाषांतर म्हणतात. सुप्रसिध्द कवी गुलजार यांनी, "चांगला अनुवाद म्हणजे फुलाबरोबर चांगल्या सुगंधाचाही भावानुवाद करणं" असे अनुवादाविषयी आपले मत प्रकट केले आहे. भारतीय लेखक के. सतचित्तानंद यांनी इंडिया आणि भारतीय या दोन शब्दांना जोडणारा पुल म्हणजे अनुवाद अशी अनुवादाची व्याख्या केली आहे. अनुवादीत पुस्तके ही दुस-याची अपत्ये वाढविण्यासारखे नाजूक आणि कठिण काम आहे- असे राजहंस प्रकाशनाच्या ग्रंथ संपादक सुजाता देशमुख म्हणतात. मराठी भाषेत पहिला अनुवाद करणा-या विल्यम कॅरी यांनी मॅथ्यूचे शुभवर्तमान हे बायबलचे भाषांतर प्रथम मराठीत आणले.त्यानंतर संस्कतमधील जगन्नाथ पंडीत यांचे गंगालहरी हे पुस्तक आनंदीबाई लेले यांनी मराठीत आणले. शेवटी असे म्हणता येईल भाषांतर ही जगाला जोडता येणारी एक शाब्दिक साखळी आहे. स्त्री नाटकारांनी अनुवादीत केलेल्या नाटकांचा परामर्श खालीलप्रमाणे घेता येईल.

**अनुवादीत नाटकाचे स्वरुप :-**

`सोयरीक ` हे फ्रेंच भाषेतील नाटक शकुंतला परांजपे यांनी मराठी भाषेत या नाटकाचा अनुवाद केला. त्या फ्रेंच भाषेच्या चांगल्या जाणकार असल्याने त्यांनी सरळ फ्रेंच भाषेतून दोन नाटके मराठी भाषेमध्ये अनुवादीत केली आहेत. लाबिश युजेन व मार्टिन एड यांच्या `ला पुद्र ओ-सि-य`या विनोदी नाटकाचे रुपांतर`सोयरीक ` या नावाने शकुंतलाबाई यांनी केलेले आहे. या नाटकात वधूपक्ष आणि वरपक्ष दोघेही आपआपली खोटी श्रीमंती खरी दाखवून दुस-या पक्षाला फसविण्याचा प्रयत्न करीत असतात. या दोन्ही पक्षाची कशी फजिती तिऱ्हाईत माणसाकडून होते असे या नाटकाचे कथानक आहे. संपूर्णतः विनोदी अशा स्वरूपाचे कथानक असलेला हा मराठीतील पहिला स्त्रीकृत अनुवाद आहे. तसेच त्यांचे दुसरे अनुवादीत नाटक म्हणजे `ल व्हाय्यज द मसिय पेरिशॉ` या फ्रेंच नाटकाचे अनुवादीत `चढाओढ` हे रुप होय. या नाटकाचे कथानक गुंतागुंतीचे आहे. एकच तरूणी वधू म्हणून आपल्याला कशी मिळेल यासाठी दोन तरूणांचा प्रयत्न आणि त्यांचे डावपेच हा या नाटकाच्या कथानकाचा विषय आहे. दुसऱ्यावर उपकार करून त्याला कृतज्ञेच्या ओझ्याखाली लपवून त्याला त्याची जाणीव करुन देवून आपण त्याच्यावर किती उपकार केले आहेत याचा संपूर्ण विचार या नाटकात आलेला आहे. या प्रहसनात बुध्दिमत्ता आणि मानवी स्वभावाचे सखोल ज्ञान प्रतिबिंबीत झाले आहे. या नाटकाची भाषा साधी व सरळ अश्या स्वरुपाची आहे.

सरिता पदकी यांनी ऑर्थर वॅटकिन यांच्या Not in the Book या नाटकाचे रूपांतर `खून पहावा करुन` असे केले आहे. हे एक रहस्यमय अशा स्वरुपाचे नाटक आहे. आयुष्यभर सरळ मार्गाने व पापभिरु वृत्तीने वागणाऱ्या आप्पासाहेबावर खूनाचा आरोप येतो. समशेरसिंगाच्या फोनवरुन मुबईच्या आप्पासाहेबांना ब्लॅकमेल करणार या त्यांना कळालेल्या गोष्टी आणि गॅंगच्या हस्तलिखितातील सत्य या सर्व विरोधातून हे नाटक वाटचाल करताना दिसते. तसेच त्यांचे दुसरे नाटक `पांथस्थ ` हे मूळ युजीन ओ नील यांच्या अ विल्डरनेस या नाटकाचे रुपांतर आहे. १९६० ला या नाटकाचे भाषांतर केले गेले. अमेरिकेच्या कनेक्टिकट राज्यातील एका मोठया गावी राहणाऱ्या मिलर कुटुंबाची ही कथा आहे. इव्हनिंग ग्लोब या नावाच्या वर्तमान पत्राचा मालक नॅट मिलर त्याची पत्नी रस्सी, आर्थर, रिचर्ड, तसेच मिलट्रेंड आणि टॉमी ही त्यांची मुले, त्यात सिड् डेव्हिस हा एस्सीचा भाऊ तर लिला मिलर ही नॅटची बहिण असे आठ जणांचे कुटुंब आहे. या कुटुंबाचे चित्रण या नाटकात आलेले आहे. तसेच त्यांचे अनुवादीत नाटक आल्बेर काम्यू यांच्या The Just Assassins चे रुपांतर `यात्रिक ` या नाटकात केले आहे. साधारण ५० वर्षापूर्वीचा काळ म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळ या काळात बंगाल प्रांतात जमीनदारांचे प्राबल्य होते. हे भांडवलदार ब्रिटिशांचे साथीदार होते. त्यांच्या विरुध्द दहशतवादी कारवाया करीत होते. आंतकवाद्यांच्या चळवळीतील पार्श्वभूमी य नाटकासाठी निवडयात आली आहे.

शिरीष पै यांनीही परकीय भाषांतून मराठीत अनेक नाटकाचे अनुवाद केले आहेत. त्यात त्यांनी सोन्याची खान या नाटकचे रुपांतर केले आहे. या नाटकाचे मूळ लेखक रुथ गोएल्स आणि ऑगस्टस गोएल्स या दोघांनी मिळून लिहिलेल्या एअरेस या मुळ लेखक इंग्रजी नाटकाचा अनुवाद त्यांनी केला आहे. या नाटकाची नायिका तिचे वडील डॉ. जयसुर्य हे एक प्रतिष्ठित व नावजलेले श्रीमंत तसेच डॉ.जमखिंडीला राहणारी वसुंधरा ही त्याची विधवा बहिण आत्याच्या संगतीत गायत्रीचा वेळ चांगला जातो. गायीत्रीची आई तिचा जन्म होताच वारलेली त्यामुळे तिच्यावर वडिलांचा रोष, सतत आईची मुलीबरोबरची तूलना त्यामुळे गायीत्रीची मनोवृत्ती वेगळी, एकाकी बनली आहे. कोणात न मिसळणे, बाहेर फिरायला न जाणे, मित्र मैत्रिणी कमीच , उंचीवस्त्र, अलंकार यांची आवड नसणारी, एकलकोंडी एकाकी अबोल बनली आहे. बाबांना खुश करण्यासाठी मात्र सतत प्रयत्नशील आहे. अशा या व्यक्तीरेखा भोवती हे नाटक फिरताना दिसते. मालती बाई बेडेकर यांनी ` हिरा जो भंगला नाही`हे नाटक फ्रेंच लेखिका मादाम मार्सेल यांच्या ` ॲनास्थेशिया`या नाटकाचे मराठीत रुपांतर केले आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाले परंतु वेळोवेळी हिंदू मुस्लिमांमध्ये जातीय तणाव वाढून दंगली उसळल्या, संस्थाने खालसा करुन त्यांचे एक एकसंघ भारतात विलीनीकरण करण्याची मोहिम हाती घेण्यात आली. हैद्राबाद संस्थानचा निजाम या विलीनीकरणाला तयार न झाल्याने निझाम राजवटीत स्वातंत्र्याचा लढा तीव्र झाला. पोलीस ॲक्शन घेवून निजाम राज्य खालसा करण्यात आले. त्यात एका संस्थानिकांच्या घरातील स्त्रीची होरफळ कशी होते ही या नाटकाची पार्श्वकहाणी आहे.

आरती हवालदार यांनी चांगुणा हे नाटक यर्मा या नावाच्या स्पॅनिश भाषेतील नाटकाचे इंग्रजी भाषेतील रुपांतर केलेले नाटक आहे. हे अभिजात अशा स्वरूपाचे नाटक समजले जाते. मुंबई च्या अविष्कार या संस्थेने १९७४ मध्ये सरकारी नाटय स्पर्धेत सादर करुन या नाटकाने प्रथम क्रमांक मिळविला आहे. एका शेतकरी कुटुंबाचे चित्रण या नाटकात आलेले आहे.

तसेच आन्तिगॉन हे नाटक झा आनुई या फ्रेंच नाटककाराचे आहे. या नाटकाचा मराठीत अनुवाद शांता वैद्य यांनी केला. या नाटकाची नायिका आन्तिगॉनचा लढा हा दैवी न्याय मिळविण्यासाठी नसून अनियमित, जुलमी राजसत्येविरूध्दचा आहे. नीतिभ्रष्ट समाज आणि आत्यंतिक आदर्शवादी नायिका यांच्यातील विरोध हा या नाटकाचा मूळ गाभा आहे. तसेच मोलीयर च्या ल तार्त्युफ या फ्रेंच नाटकाचे रुपांतर १९८८ मध्ये केले. अभिजात नाटकांच्या फ्रेंच परंपरेनुसार या नाटकाची सुरूवात जवळ जवळ त्याच्या संघर्ष बिंदूपासून होतो आणि त्याचा शेवट ढोंग उघडकीस आणण्यात होतो. हे या नाटकाचे मध्यवर्ती आशयसूत्र आहे. तसेच माधुरी भिडे यांनी ग्रीक शोकनाटये भाग १ व २ या नावाने इस्किलसच्या सहा नाटकांचा अनुवाद केला. त्यांचे गाजलेले नाटक म्हणजे ' किंग इडिपस `प्रज्ञा उदगावकरांनी राजा इडिपस हा मराठी अनुवाद केला आहे. तसेच त्यांनी १९८२ साली एक रशियन नाटकही मराठीत आणले. ॲन्टोन पावलेपिच हे चेकाव्ह यांचे द चेरी आर्चड यांचे चोरीचा मळा या नावाने मराठीत आणले. वेटींग फॉर गोदो हे विख्यात नाटक सॅम्युअल बेकेट या फ्रेंच नाटककाराचे आहे. एन अटेन्डॉ गोदो तब्बल ५ दशकानंतर वेटींग फॉर गोदोचा अनुवाद माधुरी पुरंदरे यांनी न भयम् न लज्जा केला आहे.

**समारोप :-**

वरील अभ्यासाअंती शेवटी असा निष्कर्ष निघतो की, अनुवाद म्हणजे खरंच एक पुनर्सृजनात्मक अशी कलाकृती आहे. अनुवाद हा अनुवाद न वाटणे यातच अनुवादकाचे खरे यश सामावलेले असते. मुळ लेखनातील प्रवाहीपणा त्यात उतरायला हवा अनुवादक हा मुळ लेखकाचा मुद्दा, त्याला जे काही सांगावयाचे आहे तो संदेश यांचा चांगला संवाहक असायला हवा. अनुवादीत साहित्यकृती जर मुळ साहित्यकृती वाचण्याचा आनंद वाचकाला देत असेल तर ते काम प्रथम दर्जाचे आहे असे म्हणता येईल. अनुवाद जरी दुसऱ्याचे अपत्य सांभाळण्यासारखे कठिण काम असले तरी अनुवादकाला मुळ लेखकाइतका मान देवू नका पण त्याच्या प्रतिभेकडे डोळेझाकही करून चालणार नाही. थोडक्यात जागतिकीकरणाच्या काळात अनुवादीत साहित्य ही महत्वाची भूमिका बजावताना दिसतात हे मात्र ठामपणे या ठिकाणी सांगता येईल.

**संदर्भ :-**

१. साठोत्तरी मराठी वाङ्मायातील प्रवाह - डॉ.शरण कुमार लिंबाळे
२. मालिनी - सरोजिनी कमतनूरकर
३. एकरात्र अर्धा दिवस - चिटणीस लीला
४. चढाओढ - प्रांजपे शकुंतला
५. खून पहावा करुन, पांथस्थ, यात्रिक - सरिता पदकी
६. वेटींग फॉर गोदो- न भयम् न लज्जा - पुरंदरे माधुरी
७. सोन्याची खाण - पै शिरीष
८. हिरा जो भंगला नाही - बेडेकर मालतीबाई
९. आन्तिगॉन - वैद्य शांता